उमरेड नगर परिषद जिल्हा नागपूर

परिशिष्ट जी

बांधकाम / विकास परवानगी अंतीम मंजुरी प्रमाणपत्र

क्रमांक–एमसीयु/410/4119/2017
कार्यालय नगर परिषद उमरेड
दिनांक – 19/06/2017

प्रति,

श्री/श्रीमती मे. बालाजी कृपा रियल इस्टेट अॅन्ड डेव्हलपर्स,
रा. बरेजा लेआऊट, कावरापेठ, उमरेड.

विषय – निवासी /सदनिका बांधकामास अंतीम परवानगी देणेबाबत.

संदर्भ – 1) आपला बांधकाम परवानगी मंजुरीबाबत अर्ज दिनांक 16/12/2016.
2) या कार्यालयाची प्लींथ लेव्हलपर्यंत मंजूर केलेली बांधकाम परवानगी जा.क. एमसीयु/07/बांवि. 2017, दि. 03/04/2017.
3) आपला परिशिष्ट 'एफ' सह पुढील बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज दि. 07/06/2017.

आपले उपरोक्त संदर्भ क्र. 3 वरील अर्जाचे अनुषंगाने आपणास उमरेड नगर परिषद हददीतील **पेठ कावरापेठ**, मालमत्ता क्रमांक **15658 ते 15673, सिटी सर्व्हे शिट क्रमांक 12/1, 12/2 प्लाट क्रमांक 303 ते 318** मधील आपल्या मालकीच्या जागेवर नकाशात लाल शाईनें दर्शविल्याप्रमाणे **2177.90 चौ.मी.** जागेवर येणेप्रमाणे – **एकूण 1908.018 चौ.मी.** रहिवासी वापराचे ईमारत बांधकाम करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये आपण प्लींथ लेव्हल पर्यत केलेले बांधकाम मंजुर नकाशासी सुसंगत असल्यामुळे प्लींथ लेव्हल वरील संपुर्ण बांधकाम करण्यास खालील अटी व शर्तीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

1. बांधकामास लागणारे साहित्य स्वतःच्या जवाबदारीवर व स्वतःचे जागेवर ठेवावे लागेल.
2. बांधकाम परवानगी मंजूरी तारखेपासून 1 (एक) वर्षाकरिता ग्राहय राहील व त्यास तीन वेळा मुदतवाढ देण्यात येईल. मुदतीच्या आंत बांधकाम सुरू करून पूर्ण करणे शक्य नसल्यास मुदतीच्या आंत मुदतवाढीसाठी एक महिण्यापूर्वी अर्ज करून परवानगी घ्यावी लागेल.
3. बांधकाम साहित्य रस्ते, गटारे, सार्वजनिक उपयोगाच्या व राहदारीच्या जागेवर ठेवत्ता येणार नाही. राहदारीच्या जागेवर वा गटारावर बांधकाम साहित्य टाकल्यास पूर्व सुचना न देता महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 179 अन्वये कार्यवाही करून हटविण्यात येईल
4. मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक आहे तसे करीत नसल्याचे आढळल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 52, 53, 54 तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.
5. कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी आपणावर राहील. आपले हक्क संबंध पाहून बांधकाम करावे.
6. बांधकाम पूर्ण झाल्यावर 1 (एक) महिण्याचे आंत इमारत वापर प्रमाणपत्र नगर परिषदेकडून प्राप्त करावे लागेल. त्या शिवाय वास्तुचा उपयोग घेता येणार नाही.
7. आपले बांधकामातील सांडपाणी सार्वजनिक गटारे पर्यत सोडण्याची जवाबदारी आपली राहील. तसेच पाऊस पाणी संचय करीता आवश्यक उपाययोजना (रेनवॉटर हार्वेस्टिंग) करणे बंधनकारक आहे.

8. वेळोवेळी शासनाकडून ज्या अटी व शर्ती लागू होतील त्या आपणास बंधनकारक राहील.
9. बांधकामास सुरवात करतेवेळी कमीत कमी 4 वृक्ष लावणे आपणावर बंधनकारक राहील. इमारत बांधकाम प्रमाणपत्र देते वेळी वरील अटीची पूर्तता तपासण्यात येईल.
10. प्रत्यक्ष बांधकाम साईटवर सर्वांना दिसेल असा फलक खालील प्रमाणे लावावा.
11. इमारतीचे डिझाइन भारतीय मानक ब्युरो ने भुकंप रोधक बांधकामाचे संदर्भात विहीत केलेल्या तरतुदीनुसार पुर्तता करण्याची जबाबदारी आपली आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना / नैसर्गीक आपत्ती झाल्यास होणा–या नुकसानास आपण जबाबदार राहाल
12. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 अन्वये लागु करावयाचे उपाय योजना नुसार आवश्यक सोय उभारून अधिनियमातील कलम 3(3) व नियम 4(1) नुसार प्रमाणपत्र सादर केल्या शिवाय इमारतीचा भोगवटा / वापर करता येणार नाही.
13. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीबी–4312/युओआर 259/ नवि–11/ दिनांक 10 जानेवारी 2012 अन्वये इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार यांचे संदर्भात कामगार विभागाने निर्गमीत केलेले नियम / परिपत्रक/प्रचलित आदेश याची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी मालकाची आहे. यात अनियमितता आढळल्यास होणा–या कार्यवाहीस आपण मालक जबाबदार राहाल.
14. इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्पेशिफीकेशन प्रमाणे करण्याची जबाबदारी आपली राहील
15. फ्लाय ॲश विटा, ब्लॉक्स, टाईल्स अथवा क्ले फ्लाय ॲश/सिमेंट फ्लाय ॲश विटा/ब्लॉक्स व टाईल्सचा बांधकामात वापर करावा. बांधकामात फ्लाय ॲश विटा, ब्लॉक्स, टाईल्स अथवा क्ले फ्लाय ॲश साहित्य वापरणेबाबत वास्तुविशारद (Architect) चे प्रमाणपत्र सादर न केल्यास इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

फलकाचा तपशिल –

1. मालक (नाव) **श्री/श्रीमती मे. बालाजी कृपा रियल इस्टेट ॲन्ड डेव्हलपर्स, रा. बरेजा लेआऊट, कावरापेठ, उमरेड.**
2. आर्कीटेक्ट / इंजिनीयर (नाव) **श्री. अलोक डि. लुनियॉ.**
3. मालमत्ता क्रमांक **15658 ते 15673, सिटी सर्व्हे शिट क्रमांक 12/1, 12/2 प्लाट क्रमांक 303 ते 318**
4. परवानगी क्रमांक– एमसीयु/ 410/बावि/17, दिनांक 19/06/2017
5. परवानगी दिलेले बांधकाम क्षेत्र **2177.90 चौ.मी.** जागेवर येणेप्रमाणे – **एकूण 1908.018 चौ.मी.** रहिवासी वापराचे ईमारत बांधकाम परवानगी बाबत.
6. मंजूर नकाशे बांधकामाचे ठिकाणी पाहावयास मिळेल.

सहपत्र – मंजुर नकाशा 1 प्रत

19/06/17

मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड

2017293140401201

प्रतिलीपी – 1) मा. जिल्हाधिकारी, नागपूर
2) मा. सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय नागपूर
3) कर अधिक्षक, नगरपरिषद उमरेड

2017

मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड